**बिसेन डेन्टल केअर**

डॉ.दिप(पंकज) बिसेन डॉ.खुशबू बिसेन(पटले)

दंत व मुख रोगविशेषज्ञ
बी.डी.एस.(नागपूर)

ताज मेरीप्लेक्स, गर्ल्स कॉलेज रोड गोंदिया

सकाळी:- ११ ते ३ सायं ६ ते ९ वाजेपर्यंत संपर्क:- ९५४५६८१८७०



साप्ताहिक http://berartimes.com

# बेरार टाईम्स

मुख्य संपादक :- खेमेंद्र कटरे, सहसंपादक :- सुरेश भदाडे









बेरार टाईम्स द्वारा प्रकाशित पर्यटन पुस्तिका उपलब्ध अंक व जाहिरातकरिता संपर्क स्थळ



आर.एन.आय.क्र. एमएएचएमएआर/२०११/४६५१० | वर्ष -१० गोंदिया | अंक ४१ | बुधवार,दि.१५ सप्टेंबर २०२१ | पृष्ठ-४ | किंमत-३ रुपये | Postal Reg.No.NPMFL/107/2019-2021


## वर्धा नदीत बोट उलटून एकाच कुटुंबातील ११ बुडाले

**अमरावती–** जिल्ह्यातल्या वरुड तालुक्यातील बेनोडा शहीद पोलिस स्टेशन अंतर्गत येत असलेल्या श्री क्षेत्र झुंज येथून वाहणाऱ्या वर्धा नदीत नाव उलटून ११ जण बुडल्याची प्राथमिक माहिती मिळाली आहे. त्यापैकी ३ मृतदेह बाहेर काढण्यात आले आहे. इतरांचा शोध सुरु आहे. मंगळवारी सकाळी ११ वाजताच्या सुमारास ही घटना घडली. नावाडी वगळता नावेत बसणारे इतर सर्व एकमेकांचे नातेवाईक होते. ते लागतच्या गाडेगाव येथील मटरे कुटुंबियांकडे दशक्रियेच्या कायक्रमासाठी आले होते.





प्राप्त माहितीनुसार, एकाच कुटुंबातील ११ जण गाडेगाव येथील मटरे कुटुंबीयांकडे दशक्रियेच्या विधीसाठी आले होते. दशक्रियेचा कार्यक्रम आटोपल्यानंतर मंगळवारी सकाळी दहा वाजण्याच्या सुमारास वरुडकडे फिरायला गेले. त्यावेळी महादेवाच्या दर्शनासाठी वर्धा नदीतून बोटीने जात होते. अचानक नाव उलटली आणि अकराही जण बुडाले. बुडणाऱ्यांमध्ये नारायण मटरे( वय ४५), अश्विनी खंडाळे (वय २५), वृषाली वाघमारे (वय १९), अतुल वाघमारे (वय २५), वांशिका शिवणकर (वय २), निशा मटरे (वय २२) ,किरण खंडाळे (वय २८), अदिती खंडाळे (वय १३) , मोहिनी खंडाळे (वय ११), पियुष मटरे (वय ८), पूनम शिवणकर (वय २६) असल्याचे पुढे आले आहे. यामध्ये बहीण, भाऊ, जावई यांचा समावेश आहे.

सर्वांना जलसमाधी मिळाल्याची भीती व्यक्त केली जात आहे. अद्याप तिघांचे मृतदेह हाती लागले असून यामध्ये नावाड्यासह एक महिला आणि एका चिमुकलीचा समावेश आहे. स्थानिकांनीच शोध कार्य सुरू केले.

घटनेची माहिती मिळताच बेनोडा पोलिस घटनास्थळी पोहचले, आमदार देवेंद्र भुयार ,उपविभागीय अधिकारी, तहसीलदार घटनास्थळावर असून शोधकार्य सुरू आहे.रेस्क्यु टिम येण्यापूर्वी गावातील लोकांनीच नदीपात्राात मृतदेह शोधून काढले हे विशेष.एस डी एम नितिन हिंगोले, बेनोडा पोलिस स्टेशनचे ठाणेदाराचे सरकटे, तलाठी एस के गोलवाल हे सुध्दा घटनास्थळी दाखल झाले आहेत.

## ओबीसी सेवा संघ लाखांदूरच्यावतीने जातीनिहाय जनगणनेसाठी आंदोलन

**लाखांदूरः–** ओबीसींची जातनिहाय जनगणना व्हावी यासाठी, ओबीसी सेवा संघ व ओबीसी जनगणना परिषद लाखांदूरच्या वतीने लाखांदूर येथे १४ सप्टेंबरला टी पॉईट लाखांदूर येथे धरणे आंदोलन आयोजित करण्यात आले.



केंद्र सरकारने नुकत्याच झालेल्या संसदेच्या अधिवेशनात जातीनिहाय जनगणनेच्या लेखी प्रश्नाला उत्तर देतांना केंद्रीय गृहराज्यमंत्री यांनी ओबीसिंची जातीनिहाय जनगणना २०२१च्या जनगनणेत होणार नाही असे स्पष्ट केले आहे.

स्थानिक स्वराज्य संस्थामध्ये असलेले ओबीसी आरक्षण नुकतेच सुप्रीम कोर्टाने रद्द केले, जोपर्यंत ओबीसीची आकडेवारी केंद्र सरकार जमा करणार नाही तोपर्यत ओबीसीचे राजकीय आरक्षण टिकणार नाही, त्यामुळे भारता–तील जवळपास ५२००० राजकीय पदाचे जि.प.,पंस, ग्रामपंचायत, नगर पालिका, महानगर पालिका येथील आरक्षण संपुष्ठात आलेली आहेत.

मंडळ आयोगाच्या शिफारशी तत्कालीन प्रधानमंत्री व्ही पी सिंग यांनी स्विकारल्या, मंडळ आयोगाने संपूर्ण मागास जा–तीचा अभ्यास करून १९३१ च्या जनगणणे प्रमाणे ५२ टक्के असलेल्या ओबीसीना ५२ टक्के आरक्षण देण्यात यावे अशी शिफारस केली होती. परंतु १९९० ला केंद्र सरकारने २७ टक्के शिक्षण व नोकऱ्यात आरक्षण दिले.आणि १९९४ पासून महाराष्ट्त राजकीय आरक्षण देण्यात आले. परंतु तेव्हापासून आजपर्यत ओबीसीची जनगणना झालीच नाही. त्यामुळे ओबीसीची जातीनिहाय जनगणना करण्यात यावी, यासाठी लाखांदूर येथे ओबीसी सेवा संघ व ओबीसी जनगणना परिषद लाखांदूर यांच्या वतीने एक दिवसीय धरणे आंदोलन करण्यात आले.आंदोलनानंतर तहसिलदारामार्फत निवेदन पाठविण्यात आले.आंदोलनात ओबीसी सेवा संघ,ओबीसी जनगणना परिषदेसह इतर संघटनेचे पदाधिकारी तालुक्यातून व जिल्हास्थळावरुन सहभागी झाले होते.

## जिल्ह्यातील सहा तालुके कोरोनामुक्त

**गोंदिया, :** शासकीय वैद्यकीय महाविद्यालय गोंदिया येथील विषाणू संशोधन व निदान प्रयोगशाळेतून आज १४ सप्टेंबर रोजी प्राप्त अहवालात जिल्ह्यात नविन ० कोरोना पॉझिटिव्ह रुग्ण आढळून आला. आज

डिस्चार्ज रुग्णांची संख्या ० आहे.आजपर्यत ४१,२११ रुग्ण कोरोना पॉझिटिव्ह आढळले आहे. ४०,५०२

रुग्णांनी आतापर्यंत कोरोनावर मात केली आहे. क्रियाशील असलेल्या जिल्ह्यातील बाधित रुग्णांची संख्या २ आहे. २ क्रियाशील असलेले बाधित रुग्ण घरीच अलगीकरणात आहेत. आतापर्यंत जिल्ह्यातील ५७६ रुग्णांचा मृत्यू

झाला. जिल्ह्यातील कोरोना बाधित रुग्ण आजारातून बरे होण्याचे प्रमाण ९९.२७ टक्के आहे. बाधित रुग्णांचा मृत्यू दर १.४० टक्के आहे तर डब्लिंग रेट ६७४.६ दिवस आहे.गोंदियाच्या शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातील विषाणू संशोधन व निदान प्रयोगशाळेत कोरोना विषाणूच्या तपासणीसाठी आतापर्यत ४४८९९८ नमूने पाठविण्यात आले. यामध्ये ठढ–झउठ चे २२९२८२ नमूने असून रॅपिड अँटीजेन चाचणी (ठअढ) चे २१९७१६ नमूने आहेत. कोरोना वॉर रूममधून बाधित रुग्णांसाठी २४ तास सेवा उपलब्ध आहे. ज्या रूग्णांना काही समस्या असल्यास त्यांनी ८३०८८१६६६६ आणि ८३०८८२६६६६ या भ्रमणध्वनीवर संपर्क साधावा.

## कोविड लसीकरणाला मिळाली संजीवनी



**गोंदिया:** मागील काही दिवसांपासून महाराष्ट्र राज्यात कोविड लसीकरण मोहिम काहीशी थंडावली होती. याला कारण म्हणजे कोविशिल्ड व कोवेक्सीन लसीचे डोस तर उपलब्ध होते पण इंजेक्शन टोचण्यासाठी अत्यावश्यक डिष्पोव्हॅन सुया नव्हत्या. राज्य सरकार सुद्धा पुरेशा पुरवठा करीत नव्हते. त्यामुळे बऱ्याचदा लसीचा स्टॉक असून ही लसीकरण केंद्र बंद ठेवण्याची नामुष्की आरोग्य विभागावर आलेली होती.

आमदार विनोद अग्रवाल यांनी तातडीने स्वत: ५० हजार डीस्पो पोजेबल इंजेक्शनच्या सिरेन्स व सुया तालुका आरोग्य अधिकारी डॉ. वेदप्रकाश चौरागडे यांच्या सुपूर्द केल्या. १० हजार डिष्पो सिरेंजस मिळाल्याने कोविड लसीकरणाला एक प्रकारी नवी संजीवनीच मिळाली आहे.

कोविड लसीकरणासाठी खास तयार करण्यात आलेली एडी सिरेंजस बाजारात सहज उपलब्ध होत नाही. या सिरेंजनचे वैशिष्टय म्हणजे ती मोजून मापून ०.५ मिलच्या कोविड लसीचा करेक्ट डोस इंजेक्ट करते. त्यामुळे अतिरिक्त लस वाया जात नाही. म्हणूनच या एडी सिरीजंचे महत्व खूप वाढले आहे. यामुळे याचा तुटवडा निर्माण झाला पण त्यामुळे कोविड लसीकरण मोहिमेला सेट बॅट भेटू नये म्हणून आमदार विनोद अग्रवाल यांनी तातडीने स्वत:च्या १० हजार डीस्पोजेबल इंजेक्शन सिरेंजस व सुया तालुका आरोग्य अधिकारी डॉ. वेदप्रकाश रूखमोडे यांना सुपूर्द केल्या. दरम्यान आणि त्याबद्दल आरोग्य विभागातर्फे निवासी वैद्यकीय अधिकारी डॉ. सुवर्णा हुबेकर यांनी आमदार अग्रवाल यांचे आभर व्यक्त केले आहे.

### गोंदिया जिल्ह्यात ९३.६ टक्के पावसाची आजपर्यंत नोंद

**गोंदिया:** जिल्ह्यातील अनेक गावांत सखल भागात पाणी साचल्याने पूरसदृशस्थिती निर्माण झाली आहे.जिल्ह्यात २४ तासांत २४.५ मिमी पावसाची नोंद करण्यात आली.गोंदिया २४.९ मिमी, आमगाव २९.२ मिमि, तिरोडा ३४.७मिमी, गोरेगाव २१.६ मिमी, देवरी १८.० मिमी, अर्जुनी मोर १३.३मिमी, सडक अर्जुनी २४.२ मिमी, सालेकसा ३४.९ मिमी पावसाची नोंद करण्यात आली. गोंदिया जिल्ह्यात १ जून ते १४ सप्टेंबर या कालावधीत ९३.६ टक्के पाऊस

## जि.प.व पं.सं.च्या पोटनिवडणुकांसाठी ५ ऑक्टोबरला मतदान

**मुंबई :** धुळे, नंदुरबार, अकोला, वाशीम व नागपूर जिल्हा परिषदा व त्यांतर्गतच्या पंचायत समित्यांच्या पोटनिवडणुकांचा स्थगित केलेला निवडणूक कार्यक्रम पूर्ण करण्याच्या दृष्टीने ५ ऑक्टोबर २०२१ रोजी मतदान घेण्यात येणार आहे; तसेच पालघर जिल्हा परिषदेच्या व त्यांतर्गतच्या रिक्तपदांच्या पोटनिवडणुकांसाठीदेखील त्याच दिवशी मतदान होईल आणि सर्व ठिकाणी ६ ऑक्टोबर २०२१ रोजी मतमोजणी होईल, अशी घोषणा राज्य निवडणूक आयुक्त यू. पी. एस. मदान यांनी केली.

श्री. मदान यांनी सांगितले की, धुळे, नंदुरबार, अकोला, वाशीम आणि नागपूर या ५ जिल्हा परिषदा आणि त्यांतर्गतच्या पंचायत समित्यांमधील रिक्तपदांच्या पोटनिवडणुकांसाठी १९ जुलै २०२१ रोजी मतदान होणार होते; परंतु सर्वोच्च न्यायालयाचे ६ जुलै २०२१ रोजीचे आदेश आणि राज्य शासनाने कोविड–१९ मुळे पोटनिवडणुका स्थगित करण्याबाबत केलेली विनंती लक्षात घेऊन राज्य निवडणूक आयोगाने या निवडणुका ९ जुलै २०२१ रोजी आहे त्या टप्प्यावर स्थगित केल्या होत्या. या



प्रकरणी ९ सप्टेंबर २०२१ रोजी झालेल्या सुनावणीत मात्र सर्वोच्च न्यायालयाने राज्य शासनाचे ११ ऑगस्ट २०२१ रोजीचे कोविड–१९ संदर्भातील निर्बंध पोटनिवडणुकांसाठी लागू होत नसल्याचा निर्णय दिला आहे; तसेच पोटनिवडणुकांचा कार्यक्रम पुढे चालू ठेवण्याबाबत राज्य निवडणूक आयोगाने तात्काळ निर्णय घेण्याबाबतही आदेश दिले आहेत. हे आदेश आणि कोरोना रुग्णांची संख्या लक्षात घेवून राज्य निवडणूक आयोगाने अकोला, वाशीम आणि नागपूरसह पालघरच्या जिल्हाधिकाऱ्यांकडून कोरोना रुग्णांची संख्या व आठवडाभरातील दैनंदिन व मृतांच्या संख्येबाबत अहवाल मागविला होता. त्यावरून या सहा जिल्ह्यांतील कोरोना परिस्थिती आटोक्यात असल्याचे दिसून आले.

धुळे, नंदुरबार, अकोला, वाशीम आणि नागपूरच्या जिल्हा परिषद व पंचायत समित्यांच्या पोटनिवडणुकांसाठी २२ जून २०२१ रोजी जाहीर केलेल्या कार्यक्रमात पालघर जिल्हा परिषद व त्यांतर्गतच्या पंचायत समित्यांच्या पोटनिवडणुकांचा समावेश करण्यात आलेला नव्हता. कारण त्यावेळी कोविड–१९ संदर्भातील राज्य शासनाच्या निकषानुसार पालघर जिल्ह्याचा समावेश स्तर–३ मध्ये होता. त्यामुळे तेथील पोटनिवडणुका जाहीर केलेल्या नव्हत्या. आता मात्र या सर्व निवडणुकांची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे, असे ते म्हणाले.

आता पोटनिवडणुकांचा कार्यक्रम पूर्ण करण्याचा निर्णय घेतला आहे. राज्य निवडणूक आयोगाने धुळे, नंदुरबार,

पालघर जिल्हा परिषद व त्यांतर्गतच्या पंचायत समित्यांच्या पोटनिवडणुकांसाठी १५ सप्टेंबर ते २० सप्टेंबर २०२१ या कालावधीत नामनिर्देशनपत्रे दाखल करता येतील. २१ सप्टेंबर २०२१ रोजी नामनिर्देशनपत्रांची छाननी होईल.

पुढील टप्पे धुळे, नंदुरबार, अकोला, वाशीम आणि नागपूरच्या जिल्हा परिषदा व त्यांतर्गतच्या पंचायत समित्यांच्या पोटनिवडणुकांसोबत होतील. कारण या पाच जिल्हा परिषदा व पंचायत समित्यांच्या पोटनिवडणुकांचा कार्यक्रम छाननीनंतर स्थगित करण्यात आला होता.

आता पालघरसह सर्व ठिकाणी २१ सप्टेंबर २०२१ रोजी वैध उमेदवारांची यादी प्रसिद्ध करण्यात येईल. नामनिर्देशनपत्रासंदर्भात निवडणूक निर्णय अधिकाऱ्याच्या निर्णयाविरूद्ध जिल्हा न्यायालयात अपील नसलेल्या ठिकाणी २७ सप्टेंबर २०२१ रोजी नामनिर्देशनपत्रे मागे घेता येतील. अपील असलेल्या ठिकाणी २९ सप्टेंबर २०२१ पर्यंत नामनिर्देशनपत्र मागे घेता येतील.

५ ऑक्टोबर २०२१ रोजी मतदान; तर ६ ऑक्टोबर २०२१ रोजी मतमोजणी होईल. जिल्हा परिषदेच्या एकूण ८५ निवडणूक विभाग आणि पंचायत समितीच्या एकूण १४४ निर्वाचक गणांच्या पोटनिवडणुकांसाठी हे मतदान होईल. त्यासाठी कोरोना संदर्भातील आवश्यक ते सर्व प्रतिबंधात्मक उपाय योजून दक्षता घेण्यात यावी, असे निर्देशही देण्यात आले असल्याचे श्री. मदान यांनी सांगितले.

## सीबीसी मशिन दोन वर्षांपासून नादुरुस्त

**गोंदिया:** शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांतर्गत येणाऱ्या बाई गंगाबाई महिला रुग्णालयात मागील वर्षभरापासून सीबीसी चाचणी होत नाही. सीबीसी मशीन बंद असल्यामुळे ही पाळी उद्भवली आहे. त्यामुळे प्रसुतीसाठी आलेल्या महिलांकडून सीबीसी करण्याच्या नावावर ३०० रुपये फी आकारली जात आहे. एवढेच नव्हे तर वैद्यकीय महाविद्यालयात सुद्धा मागील चार महिन्यांपासून सीबीसी मशीन बंद आहे.

बाई गंगाबाई महिला रुग्णालयात कधीही प्रसुतीसाठी गरोदर महिलांना भरती केले जाते. परंतु रुग्णालयात सीबीसी टेस्ट होऊ शकत नसल्याने रुग्णांना खासगी रुग्णालयात सीबीसी करण्याचा सल्ला दिला जात आहे. सीबीसीची रिपोर्ट संबंधित वैद्यकीय अधिकाऱ्यांना दाखविणे आवश्यक असते. रुग्णालय परिसरात अनेक दलाल सक्रिय झाले आहेत. ते या महिला रुग्ण व त्यांच्या नातलगांना प्रलोभन देताना आढळले आहेत. सीबीसी रिपोर्ट मिळवून देण्याच्या नावावर ते प्रत्येक रुग्णाकडून ३०० रुपये वसूल करीत आहेत. उल्लेखनीय म्हणजे, सीबीसी रिपोर्ट खासगी रुग्णालयात केवळ ८० रुपयांना




मिळत आहे. असा प्रकार मागील वर्षभरापासून सुरु आहे. परंतु ही समस्या मार्गी लावण्याच्या दिशेने समस्या मार्गी लावण्याच्या दिशेने अद्याप प्रयत्न करण्यात आले नाही.

महिला रुग्णालयानंतर हीच समस्या शासकीय महाविद्यालयातही सुरु झाली आहे. मागील चार महिन्यांपासून वैद्यकीय महाविद्यालयाची सीबीसी मशीन बंद पडून आहे. तेथेसुद्धा रुग्णांना खासगी रुग्णालयातून सीबीसी करवून घेण्याचा सल्ला दिला जात आहे. महालॅब व सेंट्रल लॅबची सेवा बाई गंगाबाई महिला रुग्णालयाच्या प्रभारी वैद्यकीय अधीक्षक डॉ. सुवर्णा हुबेकर यांना याबाबत विचारणा केल्यावर त्यांनी महिला सीबीसी सेना नाही. परंतु सीबीसी मशीन बंद आहे. अशा स्थितीत महा लॅबची सेवा घेतली जात आहे. याबाबत शासनाने एक परिपत्रक जाहीर केले आहे.

त्यानुसार वैद्यकीय महाविद्यालयात सुद्धा सेंट्रल लॅबची सेवा उपलब्ध केली जात आहे. यासाठी नियंत्रण अधिकारी म्हणून डॉ. गेडाम यांची नियुक्ती करण्यात आली आहे. या संदर्भात अधिक माहितीसाठी प्रभारी अधिष्ठाता डॉ. विनायक रुखमोडे यांच्याशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला असता संपर्क होऊ शकला नाही.

## गोंदिया जिल्हा परिषद ग्रामसेवक सहकारी पतसंस्थेची आमसभा १८ सप्टेंबरला

**गोंदिया–** गोंदिया जिल्हा परिषद ग्रामसेवक सहकारी पतसंस्था मर्या गोंदिया र.न.११६ ची चौथी वार्षीक सर्वसाधारण सभा(आमसभा)१८ सप्टेबंरला सकाळी ११ वाजता मयूर लॉन कटंगी येथे आयोजित करण्यात आली आहे.

तरी सर्व संचालक व सदस्यांनी कोवीड १९ चे शासकीय नियम पाळत मास्क वापरून या आमसभेला उपस्थित रहावे असे आवाहन संस्थेचे अध्यक्ष कमलेश बिसेन यांनी केले आहे.आमसभेत मागील वार्षिक सर्वसाधारण सभेचे कार्यवृत्त कायम करणे,व्यवस्थापक समितीच्या शिफारशीनुसार ३१ मार्च २०२१ चे जमाखर्च,नफातोटा पत्रक व ताळेबंद पत्रकास मंजुरी देणे,आर्थिक वर्षात अंदाजापेक्षा अधिक झालेल्या खर्चास मंजुरी देणे,२०२०–२१ ला झालेल्या निव्वळ नफ्याचे विनियोगास मंजुरी देणे,उत्पन्न व खर्चाच्या अंदाजपत्रकास मंजुरी देणे,लेखापरिक्षणाकरीता सनदी लेखापाल नियुक्त करण्यास मंजुरी देणे,कर्जाची मर्यादा ५ लाख करण्यासोबतच उपविधीतील इतर नियम दुरुस्ती कार्यवृत्तास मंजुरी देणे,संस्थेची सार्वत्रिक निवडणुक घेण्यासह इतर अध्यक्षांच्या परवानगीने वेळेवर येणाऱ्या विषयावर चर्चा करण्यात येणार आहे.

तरी सर्व सदस्यांनी उपस्थित रहावे असे आवाहन अध्यक्ष कमलेश बिसेन यांनी केले आहे.

## कोरोनाच्या तिसऱ्या लाटेसाठी गाव पातळीपर्यंत यंत्रणा सज्ज ठेवा-जिल्हाधिकारी गुंडे



### कोविड–१९ नियमावलीचे काटेकोरपणे अंमलबजावणी करण्याचे आवाहन

**गोंदिया :** कोविड–१९ हा आजार संपलेला नाही. जिल्ह्यात जरी कोरोना बाधित रुग्णांची संख्या कमी असली तरी कोरोनावर मात करण्यासाठी कोविड–१९ नियमावलीचे काटेकोरपणे पालन करणे गरजेचे आहे. म्हणून कोरोनाच्या पार्श्वभूमीवर संभाव्य तिसऱ्या लाटेसाठी गाव पातळीपर्यत आरोग्य यंत्रणा सज्ज ठेवण्याचे निर्देश जिल्हाधिकारी नयना गुंडे यांनी दिले.

जिल्हाधिकारी कार्यालयातील जिल्हा नियोजन समिती सभागृहात आज १३ सप्टेंबर रोजी कोरोना प्रतिबंधात्मक उपाययोजनेबाबत आढावा घेण्यात आला. त्यावेळी जिल्हाधिकारी श्रीमती गुंडे बोलत होत्या. यावेळी सहाय्यक जिल्हाधिकारी अनमोल सागर, निवासी उपजिल्हाधिकारी जयराम देशपांडे, उपजिल्हाधिकारी सुभाष चौधरी, शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे प्रभारी अधिष्ठाता डॉ.विनायक रुखमोडे, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ.अमरीश मोहबे, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.नितीन कापसे यांची प्रामुख्याने उपस्थिती होती.

सद्यस्थितीत जिल्ह्यात सण/उत्सव सुरू असल्यामुळे कोरोनाच्या तिसऱ्या लाटेची शंका नाकारता येत नाही. दुसरीकडे बाजारपेठ पुर्णपणे सुरू करण्यात आले आहे. या दरम्यान कोविड–१९ चे काही निर्बंध देखील शिथिल करण्यात आले आहे. अश्या परिस्थितीत कोविड–१९ चा संसर्ग वाढण्याचा धोका निर्माण झालेला आहे.

त्यामुळे कोरोनाच्या तिसऱ्या लाटेसाठी प्रशासन व वैद्यकीय यंत्रणा सज्ज करण्यात येत आहे. तसेच तालुक्यातील आरोग्य केंद्रातील उपलब्ध खाटांना ऑक्सीजनशी जोडणी करण्यात येणार आहे.

औषधसाठा, प्राणवायू उपलब्ध ठेवणे, टेस्टींग वाढविणे, व्हॅक्सीनेशन वाढविणे व मृत्यूदर कमी करणे या बाबींना प्राधान्य देऊन नियोजन करावे, असे जिल्हाधिकारी श्रीमती गुंडे यांनी यावेळी उपस्थित अधिकाऱ्यांना निर्देश दिले.

पुढे बोलतांना श्रीमती गुंडे म्हणाल्या, कोरोनाचे संकट अद्याप टळलेले नाही. त्यामुळे मास्क वापरणे, सुरक्षीत अंतर ठेवणे व हात वारंवार स्वच्छ करणे या त्रिसुत्रीमुळेच कोरोनावर मात करणे शक्य आहे. कोरोनाच्या संभाव्य तिसऱ्या लाटेसाठी जिल्हा प्रशासनाने विविध उपाययोजना आखल्या असून त्यासाठी जिल्ह्यातील नागरिकांनी कोविड नियमावलीचे काटेकोरपणे पालन करून प्रशासनाला सहकार्य करावे असे आवाहन त्यांनी यावेळी केले. सभेला जिल्ह्यातील सर्व उपविभागीय अधिकारी, सर्व तहसिलदार, तालुका आरोग्य अधिकारी, खंडविकास अधिकारी व विविध विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

## राज्य मागासवर्ग आयोगाकडे बसण्यासाठी कार्यालयच नाही

**नागपूर :** ओबीसींचा इम्पिरेकल डेटा गोळा करण्यासाठी राज्य मागासवर्ग आयोग गठन करण्यात आले, परंतु आयोगाला बसायला अद्याप कार्यालय उपलब्ध करण्यात आले नाही. डेटा गोळा करण्यासाठी व त्याची शास्त्रशुद्ध मांडणीसाठी एजन्सी नेमली याचेही कुणाला कल्पना नाही, असे भाजपचे विधान परिषदेचे सदस्य गोपीचंद पडळकर यांनी एका निवेदनात म्हटले आहे.



ओबीसींचे राजकीय आरक्षण मिळेपर्यत स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुका न घेण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला होता. त्यात कुठलेही राजकारण न करता आम्हीही त्यास पाठिंबा दिला होता. सर्वोच्च न्यायालयाने हा निर्णय रद्द ठरवला आहे.

विरोधी पक्षनेते, माजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आधीच याविषयीचे वारंवार संकेत दिले होते व आपले म्हणणे मांडले. पण या प्रस्थापितानी केंद्राकडे बोट दाखवत सेन्ससचा डेटा की इंम्पेरिकल डेटा असा वाद निर्माण केला.

जर वेळ वाया न घालवता इंपेरिकल डेटा गोळा केला असता तर आणि त्वरित न्यायालयात पुनर्विचार याचिका दाखल करून ओबीसींचे राजकीय आरक्षण पुन्हा मिळाले असते. आता उशिरा सरकारला देवेंद्र फडणवीसांचे म्हणणे कळून चुकले आहे. इंपेरिकल डेटाशिवाय आपल्याला हे ओबीसींचे राजकीय आरक्षण खेचून आणता येणार नाही, हे त्यांनी मान्य केले आहे.

आता तरी कामाला लागा, स्व:ताच्या दिशाहीन धोरणासाठी ओबीसींचा बळी देऊ नका. लवकरात लवकर इंपेरिकल डेटा गोळा करा. अध्यादेश काढा नाहीतर ओबीसी, भटके विमुक्त समाज तुम्हाला तुमची जागा दाखवून देईल, असेही पडळकर यांनी म्हटले आहे.

## संपादकीय

### पवारांचे काँग्रेसवर शरसंधान रहस्य काय?

राष्ट्रवादी काँग्रेसचे सर्वेसर्वा आणि राज्यातील महाविकास आघाडीचे शिल्पकार शरद पवार यांनी काँग्रेस दिवसेंदिवस शक्तिहीन होत असून अजूनही आपल्या गतवैभवात रमत असल्याचे जाहीरपणे सांगून टाकले. खरे तर, काँग्रेसची गेल्या सात वर्षांत कशी लक्तरे झाली आहेत हे सर्व देश बघत आहे, त्याच काँग्रेसला मांडी लावून शरद पवार यांचा राष्ट्रवादीकाँग्रेस महाराष्ट्रात सत्तेची फळे चाखत आहे, मग पवारांना एकदम काँग्रेसची उबळ का यावी?

काँग्रेसच्या विचारात आणि काँग्रेसच्या संस्कारात शरद पवार यांचे सार्वजनिक जीवन सुरूझाले आणि काँग्रेसने त्यांना राज्याच्या मुख्यमंत्रीपद-ापासून केंद्रात मंत्रीपद तसेच लोकसभेतील विरोधी पक्ष नेतेपदही दिले. काँग्रेसमध्ये राहून काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्षपद पवारांना कधी मिळाले नाही किंवा खेचूनही घेता आले नाही. पक्षातील दिग्गज नेते म्हणून पक्षाचे सर्वोच्चपद मिळविण्याची महत्त्वाकांक्षा पवारांनी ठेवली व त्यासाठी पक्षाच्या अध्यक्षपदाची निवडणूकही लढवली; पण त्यात त्यांना यश लाभले नाही.

पवार नेहमीच किंवा जास्त काळ सत्तेच्या परिघात राहिले आहेत. केंद्रात भाजपची सत्ता आल्यापासून ते बरेच अस्वस्थ आहेत. त्यांना आज तरी नरेंद्र मोदी या सर्वोच्च लोकप्रिय नेत्याशी टक्कर देता आलेली नाही. गेल्या दोन लोकसभा निवडणुकीत काँग्रेसने जी खराब कामगिरी केली, त्यावरून या पक्षाला यापुढे फारसे भविष्य आहे, असेही दिसत नाही. त्यामुळेच पवारांची कोंडी झाली असावी. पवारांचा राष्ट्रवादी काँग्रेस हा काही व्यावहारिक पातळीवर राष्ट्रीय पक्ष नाही. महाराष्ट्रात सुद्धा काही टापूपुरता हा पक्ष आहे. भाजपबरोबर सूर जुळत नाहीत आणि काँग्रेस हा भाजपला पर्याय होऊ शकत नाही, असे वारंवार दिसत असल्याने राष्ट्रीय पातळीवर कोणाबरोबर जायचे, असा पेच पवारांपुढे असावा. काँग्रेसच्या निष्क्रियतेविषयी त्यांच्या मनात नाराजी असू शकते, पण काँग्रेसला संजिवनी देण्याचे काम पवार करू शकत नाहीत, हे तेवढेच खरे आहे. मग पवारांनी काँग्रेसची खोडी का काढली? काँग्रेसच्या नावाने पवारांनी बोटे का मोडली?

विदेशी जन्माच्या मुद्दयावर शरद पवारांची काँग्रेसने पक्षातून हकालपट्टी केल्यानंतर पवारांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष स्थापन केला. महाराष्ट्रात सहकार नि साखर टापूत या पक्षाने काही दबदबा निर्माण केला, पण हा पक्ष महाराष्ट्रात स्वबळावर सत्ता मिळवू शकला किंवा नंबर एक झाला, असे घडले नाही. मग काँग्रेसला दूषणे कशासाठी त्यांनी दिली? उत्तर प्रदेशात जमीनदार आहेत, त्यांची गावात हवेली असते. लँड सीलिंगमध्ये त्यांच्या जमिनी गेल्या, पण हवेली तशीच आहे, हवेली दुरुस्त करायलाही जमीनदाराकडे ताकद नाही आणि तशी अवस्था काँग्रेसची झाली आहे, असाही टोमणा ते मारतात.

महाराष्ट्रात काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस व शिवसेना यांच्या महाविकास आघाडीचे सरकार असले तरी लोकांना त्याचा काही उपयोग नाही. तिन्ही पक्षांचे नेते व प्रवक्ते आम्ही सर्व एकदिलाने काम करतो, असे भासवत असले तरी प्रत्यक्षात महाविकास आघाडीत तीव्र असंतोष आणि खदखद आहे. आघाडी सरकारमधील मंत्र्यांमध्ये आणि पक्षाच्या नेत्यांमध्ये मोठी धुसफूस आहे. शिवसेना व राष्ट्रवादी काँग्रेसने सरकार स्थापन करण्यासाठी काँग्रेसपुढे विनवण्या केल्या, पण सरकार स्थापन करताना मौल्यवान खाती सेना व राष्ट्रवादी आपल्याकडे ठेवली आणि काँग्रेसला जुजबी खाती दिली. या सरकारमध्ये काँग्रेसच्या मनासारखे काहीही घडत नाही आणि सरकारमध्ये असलेल्या काँग्रेसच्या मंत्र्यांनाही तोंड बंद करून बसावे लागत आहे. पूर्वीच्या काळात जमीनदारांकडे हजार एकर जमीन असायची, आता पंधरा-वीस एकरही नसते; पण आजूबाजूचे हिरवे शिवार दिसताच, ते आमचे होते, असे जमीनदार सांगतो आणि भूतकाळातील वैभवात रमतो, अशी काँग्रेसची अवस्था आहे. शरद पवारांनी व्यक्त केलेल्या या भावनेशी काँग्रेस सहमत होणार नाही. पण पवारांनी काँग्रेसवर तीर मारुन अनेकांना पुढील राजकारणाविषयी संभ्रमात टाकले आहे.

पवार हे संसदेत मोदीविरोधक आहेत, पण त्यांच्याशी ते नियमित संपर्क ठेऊन आहेत. पवार हे अमित शहा यांच्याशी वेळोवेळी संपर्कात असतात; पण त्यांच्या संपर्कातून किंवा भेटीगाठीनंतर राष्ट्रवादी काँग्रेस भाजपबरोबर चाललाय, असे निष्कर्ष काढता येत नाही. पवार हे बोलतात एक व करतात दुसरेच, असे अनेकदा म्हटले जाते. वीस वर्षांपूर्वी सोनिया गांधींच्या विदेशी जन्माच्या मुद्दयावरून पवारांनी काँग्रेसमध्ये बंड पुकारले व त्याच काँग्रेसप्रणीत यूपीएमध्ये ते केंद्रात मंत्री म्हणून सहभागी झाले होते. ज्या शिवसेनेवर पवारांनी सदैव जातीयवादी म्हणून टीकेची झोड उठवली, त्याच सेनेच्या पक्षप्रमुखांना राज्याचे मुख्यमंत्रीपदावर त्यांनी बसवले. केवळ भाजप राज्यात नको, या एकाच मुद्दयावर पवारांनी महाविकास आघाडीची मोट बांधली. सरकारमधील घटक पक्षांवर एकमेकांनी टीका करू नये, हे संकेत असतात; पण पवारांनी काँग्रेसवर शरसंधान करून राज्यातील काँग्रेसचा संताप आपल्यावर ओढवून घेतला आहे.

आगामी निवडणुका काँग्रेस स्वबळावर लढवणार असल्याचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले व मुंबई काँग्रेसचे अध्यक्ष भाई जगताप यांनी जाहीर करून टाकले आहे. हे दोन्ही नेते त्याचा वारंवार पुनरुच्चारही करत आहेत. त्यामुळे शिवसेनेची गोची झाली आहेच. आता शरद पवार यांनी काँग्रेसवर शरसंधान करून महाविकास आघाडीवर हातोडा मारण्याचे काम केले आहे.

# भारताला विश्वासू मित्राची गरज!

कोणत्याही देशाच्या धोरणांमधे परराष्ट्रीय धोरण हे अत्यंत महत्वाचे मानले जाते. परराष्ट्रीय धो-रणाचा परिणाम हा विदेशाप्रमाणेच देशपातळीवरील अनेक बाबींवर होत असतो.तसेच परराष्ट्र धोरणा-वरुन आपल्या देशाचे इतर देशांशी संबंध कशा प्रकारचे आहेत याची ओळख होते.त्यामुळे परराष्ट्र धोरण ठरवितांना कोणत्याही सरकारला खूप काळजी घ्यावी ला-गते. त्यासाठी जगातील घडामोडींचे बारीकसारीक ज्ञान असलेले मंत्री आणि मुत्सद्दी यांची गरज असते. तुमच्या देशाचे स्थायी मित्र,तात्पुरते मित्र, वेळेवरचे मित्र, तसेच स्थायी शत्रू,तात्पुरते शत्रू व वेळेवरील संभाव्य शत्रू यांची सखोल माहिती सरकारला असणे आवश्यक असते.सध्या जगात शस्त्रसंपन्न होण्याची स्पर्धा वेगात सुरु आहे. प्रत्येक देश स्वतःला महासत्ता म्हणवून घेण्यासाठी उतावीळ झाला आहे. त्यासाठी एकमेकांना धमक्या, अण्वस्त्रांची भीती दाखविणे सुरु आहे.अ शावेळी जगातील सर्वात मोठा लोकशाहीप्रधान देश म्हणून भारताला आपल्या परराष्ट्रीय धोरणासंबंधी अतिशय सावध व जागृत राहणे गरजेचे आहे.तसेच आपल्या परराष्ट्र धोरणाची दिशा निश्चित व स्पष्ट असणे देशहिताच्या दृष्टीने अत्यंत महत्वाचे आहे.

अमेरिका आणि रशिया हे दोन देश पूर्वी सर्वोच्च महासत्ता व शक्तीशाली देश म्हणून ओळखले जात होते. परंतु रशियाच्या विभाजनानंतर महासत्तांची श्रेणी बदलली आहे. आता रशिया मागे पडून चीन अमेरिकेला आव्हान द्यायला लागला आहे. परंतु यामुळे भारताचे मोठे नुकसान झाले आहे. कारण पूर्वी रशिया हा भारताचा मित्र असल्यामुळे व महासत्ता म्हणून अमेरिकेचा स्पर्धक असल्यामुळे भारताला खूप फायदा होता. १९७१ च्या भारत-पाकिस्तान युध्दात रशियाच्या धमकीमुळेच पाकिस्तानच्या मदतीसाठी पाठविलेले आरमार अमेरिकेने परत बोलाविले होते. त्यामुळेच भार-ताचा विजय होवून पाकिस्तानातून बांग्लादेशची निर्मिती झाली होती. यावरुन परराष्ट्र धोरणात मित्र किती महत्वाचे असतात हे लक्षात येते.

सध्याची भारताची परिस्थिती मात्र खूपच अवघड आहे.भारताला आता मित्र तर नसल्यासारखेच आहे.परंतु शत्रूंची संख्या मात्र दिवसेंदिवस वाढतच आहे. रशिया कमजोर झाल्यामुळे त्यांच्या मैत्रीचा आता विशेष उपयोग राहिला नाही. तसेच परराष्ट्र धोरणात कोणतीही सुसंगती किंवा डावपेच नाही. त्यामुळे नेपाळ, बांग्लादेश सारखे दुर्लक्षित देशही आता भारतावर डोळे वटारत आहे.काही वर्षापूर्वी भारताकडे उगवती महासत्ता म्हणून सारे जग पाहत होते. कारण त्यावेळी देश म्हणून आ-पली धोरणे ठरत होती.आज मात्र सगळा कारभार व्यक्तीकेंद्रीत झाल्यामुळे देश म्हणून असलेला एकजिनसीपणा नष्ट झालेला आहे. जगाची आणि देशाची वास्तविक व सत्य परिस्थिती सांगर्णाया अभ्यासक व विचारवंतांना देशद्रोही म्हणून टार्गेट केले जात आहे.परंतु यामुळे वस्तुस्थिती बदलू शकत नाही याचे भान राज्यकर्त्यांना नसल्यामुळे पाकिस्तानची मगरुरी वाढत चालली आहे.

चीन दररोज आम्हाला अपमानित करत आहे. श्रीलंके सारखे छोटे छोटे देश चीनच्या सहकार्याने भारताला धमकावत आहे. सीमेलगतच्या या सर्व लहान देशांना चीन आणि अमेरिका या दोन्ही देशाचे आर्थिक व मानसिक पाठबळ आहे. त्यामुळे भारत चहूबाजूंनी घेरला गेला आहे ही वस्तुस्थिती आहे. म्हणूनच प्रचंड बहुमत असूनही पाकिस्तानचे आम्ही काहीच वाकडे करु शकत नाही ही आमची हतबलता आहे.

कोणत्याही सरकारचे एक मंत्रीमंडळ असते. त्याचे वेगवे-गळे विभाग असतात व प्रत्येक विभागाचे एक किंवा दोन मंत्री असतात. प्रत्येकाला आपआपल्या विभागाचे निर्णय घेण्याचे स्वातंत्र्य असते. काही निर्णय सर्वांच्या सहमतीने घेतले जातात. परंतु इथे जर सर्वच खात्याचे निर्णय एकदोन व्यक्तीच घेत असतील, परराष्ट्र दौंय़ात परराष्ट्र मंत्र्याला काहीच किंमत नसेल व मंत्री हे फक्त सही करण्यापुरतेच नाममात्र असतील तर देशाची अधोगतीच होणार आहे. सर्वांचा सहभाग, सामूहिक निर्णय, जबाबदारी हे लोकशाहीचे तत्व नाकारुन एकानुवती पध्द-तीचा कारभार सुरु असल्यामुळे देश सध्या विचित्र अवस्थेतून वाटचाल करीत आहे. इतक्या मोठ्या लोकशाहीप्रधान देशाला आपल्या आजूबाजूंनी एकही मित्र नसणे ही फार मोठी शोकांतिका आहे. त्यामुळे एखादा ताकदवर आणि विश्वासू मित्र जोडणे हे सत्त-ाधा-यांच्या समोरील सध्याचे मोठे आव्हान आहे.

आता अफगाणिस्तानात तालिबानने सत्ता हातात घेतली आहे. पाकिस्तानी व तालिबानी एकाच विचाराचे आहेत. काश्मीर विषयी दोघांचेही विचार सारखेच आहेत.तरीसुध्दा आम्हाला तालिबान विषयी स्पष्टपणे काहीच बोलता येत नाही ही गोष्ट आमची कमजोरी व मजबूरी दर्शविते.तिकडे चीन टपूनच बसला आहे.

अमेरिका पाकिस्तानचा मित्र असल्यामुळे, पाकिस्तानी अतिरेक्यांनी आमचे अनेक जवान शहीद करुनही आम्ही त्यांच्यावर मोठी कारवाई करु शकत नाही.रशिया स्वतःच संकटात असल्यामुळे आता त्यांच्याकडून मदतीची अपेक्षा करण्यात अर्थ नाही. काही वर्षापूर्वी भारताच्या भरवशावर असलेले नेपाळ सारखे टिल्लू देशही आता आमची खिल्ली उडवत असेल तर हा देशाच्या परराष्ट्र धोरणाचा व ते राबविर्णाय़ा राज्यकर्त्यांचा सपशेल पराभव आहे. विविध देशांच्या गटामधून भारताला वगळणे किंवा दूर ठेवणे हे कशाचे लक्षण आहे ? परदेशात जावून तेथील भारतीयांसमोर मोठमोठी आवेशपूर्ण भाषणे करुन चालत नाही. तर तिथे गेल्यानंतर त्या त्या देशांसोबत प्रत्यक्ष परराष्ट्र निती कशी राहील याचे सूक्ष्म नियोजन करणे हीच खरी मुत्सद्देगिरी असते. परंतु ते सोडून फक्त स्वतःची प्रसिध्दी आणि प्रतिमा उभारण्यातच जर आम्हाला जास्त स्वारस्य असेल तर आमचा देश महासत्ता बनणे कठीण आहे.

**प्रेमकुमार बोके**
**अंजनगाव सुजी ९५२७९१२७०६**

## फुलचूर,फुलचूरटोला नगरपंचायतीसाठीचे आंदोलन जिल्हाधिकाऱ्यांच्या आश्वासनानंतर मागे



**गोंदिया :** शहरालगतच्या फुलचूर आणि फुलचूरटोला या दोन ग्रामपंचायतीचा समायोजन करून नगर पंचायतीचा दर्जा देण्यात यावा, २१ डिसेंबर २०१९ रोजी दोन्ही ग्रा.पं.कडून प्रस्ताव सादर करून जिल्हा प्रशासनाकडे पाठविण्यात आले होते. मात्र या संदर्भात मार्गदर्शन व सुचनाच्या नावाखाली जिल्हा प्रशासनाकडून नगरपंचायतीचा प्रस्ताव पाठविण्यासाठी सतत टाळाटाळ होत असल्याने फुलचूर आणि फुलचूरटोला यो दोन्ही गावातील नागरिकांमध्ये जिल्हा प्रशासनाविरुद्ध रोष निर्माण झाल्याने ८ सप्टेंबर पासून जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आमरण अन्यत्याग आंदोलनाला सुरवात करण्यात आले होते.

फुलचूरचे माजी जिल्हा परिषद सदस्य सीए राजेश चतुर यांच्या नेतृत्वात हे आंदोलन सुरु होते. दरम्यान भाजप व शिवसेनेच्यावतीनेही आंदोलनाला समर्थन देण्यात आले होते. आंदोलन सुरु असतानाच १३ सप्टेंबर रोजी जिल्हाधिकारी डॉ.नयना गुंडे यांनी आंदोलनाची दखल घेत आंदोलनकर्ते राजेश चतुर, आमदार विजय रहांगडाले, माजी आमदार केशव मानकर, शिवनारायण नागपूरे, लक्ष्मीबाई निवीकार यांच्याशी चर्चा केल्यानंतर फुलचूर व फुलचूरटोला नगरपंचायतीचा प्रस्ताव पाठविण्याचे लेखी आश्वासन दिले.

जिल्हाधिकारी यांनी लेखी आश्वासन दिल्यानंतर माजी आमदार मानकर यांच्या हस्ते चतुर यांना निंबु पाणी पाजून आंदोलन मागे घेण्यात आले.आंदोलनाला सहकार्य केल्याबद्दल फुलचुर ग्राम पंचायत सरपंच मिलन रामटेक्कर व फुलचुर टोला सरपंच कोमल धोटे यांचे आभार आंदोलकांनी मानले.

## गोंदियात ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांचे राज्य अधिवेशन



**गोंदिया:** महाराष्ट्र राज्य ग्राम पंचायत कर्मचारी महासंघाचे १२ वे राज्य अधिवेशन गोंदियात ११ व १२ डिसेंबर रोजी घेण्याचा निर्णय संघटनेच्या राज्य कार्यकारिणीने घेतला आहे. जिल्हाध्यक्ष चत्रुघन लांजेवार यांच्या अध्यक्षतेखाली अधिवेशन आयोजनासंदर्भात बैठक पार पडली. सभेत राज्य संघटन सचिव मिलिंद गणवीर यांनी राज्य अधिवेशनाचे आयोजनाचे महत्व व अधिवेशनाच्या मुख्य पाहुणे व वक्ते म्हणून आयटकच्या राष्टीय महासचिव अमरजित कौर यांना आंमत्रित करण्यातचे सांगितले.

यावेळी अधिवेशनाच्या यशस्वतेसाठी ४ व्यवस्थापन समित्यांचे गठन करण्यात आले. यात विष्णू हत्तीमारे यांच्याकडे भोजन समिती, राजेश भोकासे यांना सजावट समिती, दिप्ती राणे व सुनिता ठाकरे महिला समिती, महेंद्र कटरे प्रचार प्रसार समितीची जबाबदारी सोपविण्यात आली. दरम्यान सुखदेव शहारे तथा आशिष उरकुडे यांनी राज्य कार्यकारिणीच्या कामकाजाचा अहवाल मांडून महासंघाच्या राज्यभर चाललेल्या मोहिमा व मंत्रालयात चाललेल्या चर्चेची माहिती दिली.

सभेला रविंद्र किटे, महेंद्र भोयर, बुधराम बोपचे, खोजराम दरवडे, विनोद शहारे, धनेश्वर जमईवार, उत्तम डोंगरे, निलेश मस्के, रमेश प्रधान, मुकेश कापगते, खुशाल बनकर, सुनिल लिल्हारे, किशोर नागपुरे, माणिक शहारे, मंगला बिसेन, दिनेश झोडे, माणिक ऊके आदी पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

## खरेदी विक्री संस्थेच्यावतीने संचालक पी.जी.कटरेंचा सत्कार



**गोरेगावः-** गोरेगाव तालुका शेतकी खरेदी विक्री संस्थेच्या पार पडलेल्या मासीक सभेत संस्थेचे संचालक पी.जी.कटरे यांची महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे प्रदेश सचिवपदी निवड झाल्याबद्दल संस्थेच्यावतीने त्यांचा सत्कार करण्यात आला. संस्थेचे सभापती डॉ. झामसिंह बघेले व उपसभापती राजेंद्रसिंह राठोड यांच्या हस्ते शाल श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन त्यांचे अभिनंदन करण्यात आले.

यावेळी संचालक डॉ.के.टी. कटरे, श्रीप्रकाश रहांगडाले,खिरचंद येळे, खेमेंद्र कटरे, व्यवस्थापक नुतन रहांगडाले यांच्यासह संस्थेचे सदस्य कर्मचारी यांनी अभिनंदन केले.

## युरीयाच्या टंचाईसाठी जिल्हा प्रशासन जबाबदार-मोरेश्वर कटरे



**गोरेगाव :** मागील काही दिवसांपासून जिल्ह्यात युरीया खताच्या कृत्रिम टंचाई निर्माण झाली असून त्याचा फटका शेतकऱ्यांना बसत आहे. एकंदरीत जिल्हा प्रशासनाच्या ढिसाळ नियोजनामुळे शेतकऱ्यांना युरीया खतासाठी वणवण भटकावे लागत असून चढ्या दराने खरेदी करावे लागत असल्याचा आरोप जिल्हा परिषदेचे माजी कृषी सभापती मोरेश्वर कटरे यांनी केला आहे.

मागील काही दिवसांपासून जिल्ह्यात पावसाने दमदार हजेरी लावली असल्याने शेतकरी सुखावला आहे. मात्र मागील काही दिवसांपासून शेतीसाठी आवश्यक असणाऱ्या युरीया खताची टंचाई निर्माण झाली आहे. शेतकरी मिळेल ते दाम देऊन युरीया खत करण्यासाठी भटकत आहे. ३०० रुपयाला मिळणारी खत बोरी सध्या ५०० रुपये देऊन ही शेतकऱ्यांना उपलब्ध होत नाही.

गोरेगाव तालुक्यातील अनेक कृषी केंद्र संचालक ५०० रुपये घेऊन खत विक्री करीत आहेत. मात्र प्रशासन धृतराष्ट्राच्या भूमिकेत असल्याचे दिसत आहे. जिल्हाधिकारी यांनी या प्रकरणी तात्काळ हस्तक्षेप करून कृषी विभागाला धारेवर धरत शेतकऱ्यांना योग्य दरात कसे युरीया खत उपलब्ध करून देण्यात येईल यासंदर्भात नियोजन करावे, अशी मागणी माजी जिल्हा कृषी सभापती मोरेश्वर कटरे यांनी केली आहे.

## भाजयुमोची नियोजन विषयक बैठक उत्साहात



**गोंदिया:** स्थानिक खासदार जनसंपर्क कार्यालयात १२ सप्टेंबर रोजी भारतीय जनता युवा मोर्चाची नियोजन विषयक बैठक उत्साहात पार पडली. बैठकीत प्रदेश अध्यक्ष विक्रांत पाटील, भाजयुमो प्रदेश प्रभारी तथा प्रदेश महामंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या जिल्हा दौऱ्याचे नियोजन व संगठन विषयक आढावा घेण्यात आला. गाव तिथे युवा मोर्चा शाखा गठन करणे तसेच संघटनात्मक विषयांवर चर्चा करण्यात आली.

बैठकीच्या अध्यक्षस्थानी भाजयुमो जिल्हाध्यक्ष ओम कटरे होते. प्रमुख उपस्थितीत भाजप जिल्हा महामंत्री संजय कुळकणी, जिल्हा महामंत्री ललित मानकर, महामंत्री हर्ष मोदी, रूपेश कुथे, संदीप रहांगडाले, मोलिंद सेवाळे, गुड्डू चांदवानी, पारस पुरोहित, गौरेश बावनकर, अंशुल बिसेन, तिजेश गौतम, बाला वहिले, अमोल तितरमारे, विवेक खंडायत, विलाश बगड़कर, इंद्रजीत भाटिया, देवराम चुटे, दिशांत चन्ने, विवेक चौधरी, रवि ठकरानी, पूरु ठाकरे, कौशल ठाकूर, पलाश लालवानी, रवि मुटकुरे, शिशुपाल राहंगडाले यांच्यासह जिल्हा पदाधिकारी, मंडल अध्यक्ष उपस्थित होते.

## शेतकऱ्यांनी धान खरेदीसाठी ३० सप्टेंबरपर्यंत नोंदणी प्रक्रिया पूर्ण करावी

**गोंदिया :** खरीप हंगाम २०२१-२२ ची धान खरेदी प्रक्रिया सुरु होण्याअगोदरच नोंदणी प्रक्रिया सुरु झालेली आहे आणि शेतकरी नोंदणी ३ सप्टेंबर पासून ते ३० सप्टेंबर २०२१ पर्यंत करणे आवश्यक आहे असे एका पत्राद्वारे शासनाने जाहिर केले आहे. तरी ज्या शेतकरी बांधवांना आधारभुत धार खरेदी केंद्रावर धान दयावयाचे आहे त्यांनी खरीप हंगाम २०२१-२२ धान/भात चा सुधारित सातबारा (खरीप २०२१-२२), नमूना ८ अ, शेतकरी नोंदणी अर्ज, आधारकार्ड झेरॉक्स, बँक पासबुक झेरॉक्स व इतर कागदपत्रे आपल्या जवळच्या संबंधीत धान खरेदी केंद्रावर नोंदणी करण्याकरीता ३० सप्टेंबर २०२१ पर्यंत जमा करावे. असे जिल्हा पणन अधिकारी,गोंदिया यांनी कळविले आहे.

**स्वामीत्व, मुद्रक, प्रकाशक व संपादक खेमेंद्र हिरदीलाल कटरे यांनी बेरार टाईम्स हे साप्ताहिक वृत्तपत्र अंगपाल पारधी, लोकजन प्रकाशन, लोकजन भवन, स्नेह नगर, तकिया वॉर्ड, भंडारा ता.जि.भंडारा येथे मुद्रीत करुन डोलारे एजन्सीजवळ चंचलबेन स्कूल रोड, गजानन कॉलनी गोंदिया येथे प्रकाशित केले. संपादक खेमेंद्र हिरदीलाल कटरे, भ्रमणध्वनी क्र. ८०८०८१५३२९ (पी.आर.बी. कायद्यानुसार जबाबदारी संपादकावर राहील) प्रसिद्ध झालेल्या मजकुराशी संपादक व प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. (गोंदिया न्यायकक्षेत)**

# .. पुन्हा लोकपाल,पुन्हा अण्णा आणि आपला राजकीय शहाणपणा

या देशात आजवर जी काही आंदोलने झाली असतील, त्यातील सर्वात बोगस आणि बिनडोक आंदोलन म्हणजे अण्णा हजारे यांचं लोकपाल आंदोलन ! आपल्या राष्ट्रीय पातळीवरील वैचारिक दिवाळखोरीचा उत्कृष्ट पुरावा म्हणून हे आंदोलन इतिहासात नोंदविले जाईल. आश्चर्य म्हणजे अनेक मोठे विचारवंत, लेखक, संपादक आणि राष्ट्रीय पातळीवर मान्यता पावलेले सामाजिक चळवळीतील धुरंधर देखील तेव्हा त्यांच्या नादी ला-गले होते. 'अण्णा.. अण्णा' करून नाचायला लागले होते. हे बघून हसावे की रडावे हेच कळत नव्हते. म्हणजे एखादा लोकपाल येईल आणि देशातील भ्रष्टाचार पार संपून जाईल, असा विचार ह्या मंडळींनी करावा, हा प्रकारच मन सुन्न करणारा होता. अत्यंत बालिश होता. तेवढाच चिंताजनक देखील होता. त्यात केजरीवाल मात्र पक्के व्यावसायिक इव्हेंट मॅनेजर होते. त्यांनी आपला गेम बरोबर साधला.

अण्णा हजारे किती शिकले आहेत, मॅट्रिक पास आहेत की सातवी पास, हा मुद्दा नाही. पारंपरिक किंवा पुस्तकी शिक्षण अथवा डिग्री हा फार अभिमानाचा विषय होता कामा नये, तसेच तो टवाळीचा देखील विषय होऊ नये. उलट शिकलेल्या लोकांपेक्षा अशिक्षित किंवा अर्धशिक्षित लोकांनी जी निर्मिती केली, शोध लावलेत ते अद्वितीय आहेत ! ( मोदी किंवा स्मृती इराणी यांच्या शिक्षणाच्या निमित्ताने जी टिंगल टवाळी होते, याचे कारण डिग्रीबाबत त्यांचा खोटारडेपणा हे आहे. त्यांनी आपल्या शिक्षणाबद्दल दिलेली खोटी माहिती आहे. )

शिक्षण किंवा डिग्री ही कुणाचीही हुशारी किंवा शहाणपणा यांची खात्री देवू शकत नाही. गाय दोन्ही बाजूंनी प्राणवायू सोडते, अशी वैचारिक दिवाळखोरी एका न्यायधिशाने दाखवल्याचे उदाहरण अगदी ताजे आहे. डॉक्टरची डिग्री असून बिनडोक, अवैज्ञानिक डायलॉग मारणारे महाभाग तर साऱ्या जगाला माहीत आहेत. त्यांच्या 'हो' ला 'हो' लावणारे अनेक नंदीबैल कॉलेजमध्ये प्रोफेसर आहेत, विद्यापीठात कुलगुरू आहेत, डिग्री घेतलेले इंजिनिअर आहेत, फार काय सायंटिस्ट देखील आहेत. त्याचेच परिणाम आपण आता भोगत आहोत. देशाचे वैचारिक आणि राजकीय कुपोषण मोठ्या प्रमाणात झाले, हे आपल्याला मान्य करावेच लागेल. स्वातंत्र्यानंतरच्या ७०/७५ वर्षात देखील आम्ही सामाजिक, आर्थिक आणि सांस्कृतिक विकासासाठी पोषक असे राजकीय मॉडेल विकसित करू शकलो नाही, ही शोकांतिका आहे ! ते आमच्याकडे उपलब्ध असल्याचे पुरावे प्रत्यक्षात दिसत नाहीत. केवळ सत्ताबदल, धर्म, व्यक्तीपूजा, मूर्तिपूजा या पलीकडचा विचारही आमच्या डोक्यात नाही, असे दिसते. तसा विचार कुणी मांडला असेल तर त्याची चिकित्सा, चर्चा करणे, दखल घेणे याचे भानही मीडिया, प्रिंट मीडिया तर सोडाच पण राजकीय, सामाजिक, आर्थिक क्षेत्रात काम करणा?या लोकांना नाही. बहुतेक वृत्तपत्रे तर आता पुड्या बांधण्याच्या कामी येतात, तेवढेच त्यांचे मोल.

सत्तर - ऐंशीच्या काळात जयप्रकाश नारायण यांनी संपूर्ण क्रांतीची हाक दिली होती. ती बऱ्यापैकी सामाजिक परंतु मुख्यत्वे राजकीय लढाई होती. त्यातून काही चांगले, सामाजिक न्यायाचा पुरस्कार करणारे प्रादेशिक नेतेही निर्माण झालेत. अर्थात त्यांना सामाजिक भान असले, तरी नेहरुसारखी विशाल दृष्टी आणि सर्वसमावेशक आर्थिक विचार मात्र दिसला नाही. आणीबाणीची चूक मान्य करूनही इंदिरा गांधी यांनी राजकीय कणखरपणाची चुणूक दाखवून दिली, हे वास्तव आपल्याला स्वीकारावेच लागेल. बांगला देशाची निर्मिती, बँकांचे राष्ट्रीयकरण ह्या गोष्टी त्यांचा राजकीय दूरदर्शीपणा अधोरेखित करणाऱ्या आहेत. त्यानंतर मजबूत इच्छाशक्ती विश्वनाथ प्रताप सिंग यांच्या नेतृत्वात दिसली.

जयप्रकाश नारायण यांची संपूर्ण क्रांती ही स्वातंत्र्यानंतरची सर्वात मोठी आणि उल्लेखनीय चळवळ होती. पण त्यांच्याकडेही आर्थिक विकासाचा समर्थ आणि व्यावहारिक अजेंडा होता, असे अजून तरी दिसले नाही. तसे असते तर निदान बिहार, युपी, ओरिसा या राज्यातून त्याची प्रचिती यायला हवी होती.

याचाच अर्थ असा, की नेहरू - इंदिरा गांधी किंवा राजीव गांधी, मनमोहन सिंग या लोकांनी जो काही राजकीय, सामाजिक अजेंडा राबवला, तो स्वातंत्र्याची लढाई, त्या निमित्ताने झालेले वैचारिक घुसळण, महात्मा गांधी यांचा अफाट लोकसंपर्क आणि त्यातून तयार झालेले त्यांचे विचार, यातून आलेला आहे. खुद्द बाबासाहेबांनी प्रचंड अभ्यासातून याबाबतीत जी काही मांडणी केली असेल, ती त्यांच्याच नावावर चालविल्या जाणाऱ्या पक्षांनी सुद्धा उपयोगात आणलेली दिसत नाही. किंवा आंबेडकरी सामाजिक चळवळीतून देखील तसे मॉडेल समोर आलेले दिसत नाही. याचाही खोलवर अभ्यास, चिंतन होणे गरजेचे आहे. केवळ आरक्षण धोरण हे सार्वत्रिक विकासाचे मॉडेल होऊ शकत नाही. तसेच केवळ धर्मांतर आणि आरक्षण म्हणजे बाबासाहेब नव्हेत, हेही आपल्याला समजून घ्यावे लागेल. त्यांची आर्थिक, राजकीय मांडणी समजून घ्यावी लागेल. त्यावर चर्चा करावी ला-गेल. अभ्यासकांनी त्या अंगाने फारसा विचार केलेला दिसत नाही. अर्थात त्यासाठी राजकीय आकलन असणे गरजेचे आहे. अन्यथा सारी मांडणी स्वप्नाळू आणि भक्तीच्या अंगाने जाण्याचा धोका असतो.

गांधी - नेहरू यांच्या काही चुकाच झालेल्या नाहीत, असाही अर्थ नाही. त्यावर देखील चर्चा, चिकित्सा झाली पाहिजे. कोणताही महापुरुष किंवा नेता तत्कालीन परिस्थिती बघूनच स्वतःचे निर्णय घेत असतो. ते आज आपल्याला चुकीचेही वाटू शकतात. पण तेवढ्यावरून ते कसे मूर्ख होते असे जे अकलेचे तारे तोडले जातात, तो सारा प्रकारच विचित्र आहे. जगातला कोणताही महापुरुष कधी चुकलाच नाही, असं म्हणणं किंवा त्या थाटात इतरांची टवाळी करणं म्हणजे आपली वैचारिक दिवाळखोरी सिद्ध करणं आहे.

सिद्धार्थ गौतमाने जो संसाराचा त्याग केला तो राजकीय अपरिहार्यतेचा भाग होता. पण त्या अपघातातून जगाला बुद्ध मिळाला. समजा, सिद्धार्थ गौतम संसार सोडून गेले नसते तर ?

सिद्धार्थ गौतम त्याच्या जागी बरोबर, सत्तेशी संघर्ष करताना माघार न घेता हसत हसत फासावर लटकणारा भगत सिंग त्याच्या जागी बरोबर, वेळ प्रसंगी दोन पावलं मागे येवून तह करणारे शिवाजी महाराज देखील बरोबरच..! कारण यापैकी कुणाच्याही कृतीमागे भीती किंवा वैयक्तिक स्वार्थ नव्हता. दूरदृष्टी होती, भविष्याचा वेध होता, वेगळी रणनीती होती. तसेच पुणे कराराच्या वेळी बाबासाहेब दोन पावले मागे आलेत, तो त्यांचा पराभव किंवा अपमान नव्हता, व्यापक सामाजिक रणनीतीचा तो भाग होता. दूरदृष्टी होती ! पुणे करारामुळे जास्तीच्या जागा मिळाल्यात हे सुद्धा नाकारून चालणार नाही. की आपण अजूनही तेवढ्यासाठी गांधींना खलनायक ठरवत राहणार आहोत, याचाही विचार करावा लागेल !

बुद्ध वेगळे, गांधी वेगळे. दोघांची तुलना दूरची गोष्ट आहे. बुद्धही चुकू शकतात, गांधीही चुकू शकतात, कुणीही चुकू शकतो ! जो आयुष्यात कधी चुकलाच नाही, असा माणूस जगाच्या पाठीवर अशक्य आहे ! चर्चा, मतभेद, चिकित्सा मान्यच ! पण टीका करतांना गांधी, नेहरू आणि गोडसे यांच्यामध्ये फरक करता आला पाहिजे. तो तसा जर करता येत नसेल किंवा सारे सारखेच वाटत असतील, तर अशी भूमिका घेणारे लोक उद्याच्या विनाशाची पायाभरणी करत आहेत, हे लक्षात घ्यावे लागेल ! अशावेळी संघाची विकृती आणि त्यांची विकृती ह्यात फारसा फरक करता येणार नाही !

ही अनर्थकारी भूमिका आम्हाला टाळावी लागेल. जमिनीवर उतरून व्यावहारिक भूमिका घ्यावी लागेल. बुद्ध असो, शिवाजी महाराज असोत, तुकाराम असो, फुले असो, शाहू महाराज असोत, बाबासाहेब आंबेडकर असोत की व्ही. पी. सिंग असो, त्यांना शक्य होतं तेवढं त्यांनी केलं, योग्य दिशा दिली. आता केवळ कुणाच्या नावाचा उदोउदो किंवा कुणाच्या नावाचा विरोध करून प्रश्न सुटणार नाहीत. पुढील अराजक टळणार नाही. बदलेल्या परिस्थितीचा, नव्या आव्हानांचा विचार करून पुढील रणनीती आपल्याला आखावी लागेल. सर्वसमावेशक भूमिका घ्यावी लागेल.

कधी धर्म, कधी मंदिर, कधी मशीद, कधी लोकपाल अशा वावटळी पुन्हा पुन्हा निर्माण केल्या जाणारच आहेत. तो त्यांचा धंदा आहे. त्यांच्या अस्तित्वाचा प्रश्न आहे. तुमचे - आमचे अस्तित्व कशात आहे, हे आपण समजून घेवून तशी कृती करणे, हीच काळाची गरज आहे.

तेव्हा पुन्हा येवू घातलेल्या लोकपाल नावाच्या भंकसबाजीपासून सावध रहा..! आतातरी आपला राजकीय शहाणपणा दाखवून द्या !

सामाजिक चळवळी खूप झाल्यात. या देशाला आता खऱ्या अर्थाने राजकीय प्रबोधनाची गरज आहे, असे वाटते ! अन्यथा तालिबानी आणि आपण यातला फरक मिटायला फारसा वेळ ला-गणार नाही !

तूर्तास एवढेच

**ज्ञानेश वाकुडकर**
**अध्यक्ष लोकजागर अभियान**
**९८२२२७८९८८**

# ओबीसी आरक्षण रद्द झालेल्या ठिकाणी निवडणुका होणार; सरकार पुढे ढकलू शकत नाही

**नवी दिल्ली :** स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका घेण्याचा पूर्ण अधिकार हा केवळ राज्य निवडणूक आयोगाचा आहे. राज्य सरकार त्यात ढवळाढवळ करू शकत नाही, असा स्पष्ट आदेश सर्वोच्च न्यायालयाने दिला आहे. ओबीसी आरक्षण रद्द झाल्यामुळे होणाऱ्या पोटनिवडणुका कोरोनामुळे पुढे ढकलण्याचा राज्य सरकारचा विनंतीवजा आदेश गैरलागू असल्याचे न्यायालयाने स्पष्ट केले आहे.

ओबीसी आरक्षणाची मर्यादा ५० टक्क्यांहून अधिक झाल्याने वाशिम, धुळे, अकोला, नंदुरबार, पालघर सहा जिल्हा परिषदांमधील आणि पंचायत समितीतील ओबीसी मतदारसंघातील निवडी ४ मार्च २०२१ रोजी सर्वोच्च न्यायालयाने रद्द केल्या. तसेच येथे पुन्हा नव्याने निवडणुका घेण्याचे आदेश दिले होते. त्यानुसार निवडणूक आयोगाने तयारी केली होती. पालघर वगळता इतर पाच जिल्ह्यांत कोरोनाची साथ कमी असल्याने तेथे निवडणूक जाहीर करण्यात आली. ८७ जिल्हा परिषद गट आणि ११९ पंचायत समिती येथे पोटनिवडणुका घेण्यासाठीचे वेळापत्रकही ठरविले. मात्र राज्य सरकारने कोरोनाचे कारण सांगून या निवडणुका पुढे ढकलण्याची विनंती निवडणूक आयोगाला केली होती.



सर्वोच्च न्यायालयाने मार्चमध्ये दिलेल्या आदेशाची अंमलबजावणी झाली की नाही यावर निवडणूक आयोगाला न्यायालयाला अहवाल द्यायचा होता. राज्य सरकारने कोरोनामुळे या जिल्ह्यांत निवडणुका घेणे शक्य नसल्याचे कारण सर्वोच्च न्यायालयाच्या निदर्शनास आणून देण्यात आले. त्यावर न्यायमूर्ती ए. एम. खानविलकर यांच्या नेतृत्वाखालील खंडपीठापुढे दोन दिवसांपूर्वी सुनावणी झाली.

निवडणुकीचे वेळापत्रक ठरविण्यात राज्य सरकारला कोणताही अधिकार नसल्याचे सर्वोच्च न्यायालयाने या आदेशाद्वारे स्पष्ट केले आहे. निवडणुकीच्या वेळा ठरविण्याचा पूर्ण अधिकार हा निवडणूक आयोगाचा आहे. तसेच चार मार्च २०२१ रोजी दिलेल्या आदेशाच्या अंमलबजावणी करण्यासाठी राज्य सरकाराचा आदेश अडथळा ठरू शकत नाही. निवडणूक घेण्याच्या परिस्थितीबाबत निवडणूक आयोग समाधानी असेल तर ही प्रक्रिया सुरू करावी, असे न्यायालयाने म्हटले आहे.

निवडणूक पुढे ढकलण्यासाठीची राज्य सरकारने जारी केलेली प्र सर्वोच्च न्यायालयने रद्द केली आहे. तसेच याबाबत दिलेल्या आदेशाच्या अंमलबजावणीचा अहवाल सहा आठवड्यांत सर्वोच्च न्यायालयाला द्यावा, असे सांगत ही सुनावणी २१ ऑक्टोबर २०२१ रोजी ठेवली आहे. या आदेशामुळे इतरही निवडणुका वेळेवर होणार असल्याचे संकेत मिळाले आहेत.

राज्यात १८ महापालिका आणि वीसहून अधिक जिल्हा परिषदांच्या निवडणुका पुढील वर्षी फेब्रुवारीत अपेक्षित आहेत. ओबीसी आरक्षण रद्द झाल्याने या निवडणुका पुढे ढकलण्याचा सर्वच पक्षांचा सूर होता. मात्र सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानंतर ही वाट बंद झाल्याचे कायदेतज्ज्ञांचे मत आहे. त्यामुळे या निवडणुका वेळेवर होण्याची चिन्हे आहेत. ओबीसी आरक्षण राहण्यासाठी सरकारला इम्पिरिकल डाटा सर्वोच्च न्यायालयात सादर करावा लागणार आहे. या आरक्षणावरील सर्वोच्च न्यायालयाचा आदेश वेळेवर आला नाही तर ओबीसींसाठी राखीव जागावर त्याच प्रवर्गाचे उमेदवार देण्याचा मनोदय जवळपास सर्वच पक्षांनी व्यक्त केला आहे.

# पटोले साकोली सोडणार?



**भंडारा:** काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष आमदार नाना पटोले यांनी साकोली मतदार संघ सोडून नागपुरातून निवडणूक लढण्याची तयारी चालविली आहे. मागील आठवड्यात साकोली दौऱ्या दरम्यान कार्यकर्त्यांना त्यांनी तसे संकेत दिले. त्यामुळे पटोलेनंतर साकोली मतदारसंघातील त्यांचा उत्ताधिकारी कोण होणार याची चर्चा राजकीय वर्तुळात आहे.

पटोले यांनी २०१९ मध्ये नागपूर लोकसभा मतदारसंघातून केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या विरोधात निवडणूक लढविली होती. या निवडणुकीत त्यांचा पराभव झाला असला तरी त्यांनी द्वितीय क्रमांकाची मते मिळविली होती. या निवडणुकीमुळे पक्षात त्यांचे वजन वाढले. त्यानंतर झालेल्या विधानसभा निवडणुकीत त्यांनी साकोली मतदारसंघातून तत्कालीन पालकमंत्री डॉ. परिणय फुके यांचा पराभव केला. नंतर पटोले विधानसभेचे अध्यक्ष बनले आणि आता काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष आहेत.

पटोले यापुढे साकोली मतदारसंघातून लढण्याच्या तयारीत नसल्याची चर्चा कार्यकर्त्यांमध्ये आहे. जुलै २०२१ मध्ये नागपुरात झालेल्या काँग्रेसच्या आढावा बैठकीत पक्षाने आदेश दिल्यास आपण दक्षिण-पश्चिम विधानसभा मतदारसंघातून लढू असे वक्तव्य पटोले यांनी केले होते.

## आ.परिणय फुके सक्रिय

**प्रदेशाध्यक्ष झाल्यानंतर पटोलेंचे राज्यभर दौरे होतात. मतदारसंघाशी त्यांचा संपर्क कमी झाला. यावरून नाराजी वाढत असतानाच विधान परिषद सदस्य डॉ. परिणय फुके यांनी साकोलीत संपर्क वाढविला आहे. आठवड्याला एक दौरा करुन लोकांच्या भेटी, कार्यकर्त्यांशी संवाद साधतात.**



# येरंडी-डोंगरगाव रस्त्यावरील रपटा धोकादायक

■ पुल बांधण्याची शेतकऱ्यांची मागणी
■ सार्वजनिक बांधकाम विभागाचे दुर्लक्ष



**अर्जुनी मोरगाव:** जवळील एक किमी अंतरावर असलेल्या येरंडी ते डोंगरगाव या डांबरीकरण मार्गावरील रपट्यावरुन अनेक वर्षापासून पाणी नाल्याचे पाणी वाहते. त्यामुळे हा रपटा धोकादायक ठरत असून शेतकऱ्यांसह अन्य नागरिकांना जीव मुठीत घेऊन ये-जा करावी लागते. मात्र याकडे सार्वजनिक बांधकाम विभागाचे दुर्लक्ष असून या पुलाची उंची वाढविण्याची मागणी परिसरातील शेतकऱ्यांनी केली आहे.

या मार्गाचे बांधकाम होऊन अनेक वर्षाचा कालावधीत लोटला आहे. रस्ता बांधकाम करताना संबंधित कंत्राटदाराने नाल्यावरुन जाणाऱ्या रस्त्यावर केवळ पाईप टाकून रपटावजा पुल केला. त्यामुळे पावसाळ्यात कमी उंचीच्या या रपट्यावरुन पुलावर पाणी वाहत राहते. परिणामी येरंडी गावाच्या शेतकरी नागरिकांना डोंगरगाव, कवठा या शेतशिवारात जाता येत नाही. तसेच या मार्गावरून शाळेत जाणारी मानव विकास योजना अंतर्गत चालणारी बस ही सुद्धा जाऊ शकत नाही. तसेच या नाल्यावर मृतदेहाचे प्रेत टाळायला पण जमत नाही, अशा अनेक अडचणी या रपट्यामुळे निर्माण झाल्या आहेत.

याबाबत येरंडी येथील शेतकरी दिलवर रामटेके यांनी सांगितले, या रस्त्यावर पाणी वाहत असल्याने प्रवास करणे धोक्याचे आहे. त्यामुळे रपट्याची उंची वाढविली पाहिजे. तर डोंगरगाव येथील शेतकरी आर. एम. नंदागवळी म्हणले, पाणी वाहत असल्याने शेतात जाता येत नाही. नाल्याच्या पाण्याचा वेग चांगलाच राहत असल्याने अपघात घडण्याची भीती नेहमीच राहते. त्यामुळे सार्वजनिक बांधकाम विभागाने तातडीने पुलाची उंची वाढवून पक्के बांधकाम करावे.

# दीड वर्षापासून अशासकीय सदस्यांच्या नियुक्त्या रखडल्या

**गोंदिया:** जिल्ह्यातील निराधार, अपंग तसेच परित्यक्ता महिलांना शासनाकडून मिळणाऱ्या विविध योजनांचा लाभ देण्यासाठी प्रत्येक तालुक्याच्या ठिकाणी असणाऱ्या संजय गांधी निराधार समित्यांवर गेल्या दीड वर्षापासून अशासकीय सदस्यांच्या नेमणुका केल्या नाहीत. त्यामुळे याचा कारभार तहसीलदारांच्याच खांद्यावर आहे. लाभार्थ्यांची प्रकरणे निकाली काढण्यासंदर्भात बैठकींचे आयोजन होत नसल्याने हजारो प्रकरणे तहसील कार्यालयात पडून आहेत. परिणामी गरजवंत लाभार्थ्यांना आर्थिक विवंचनेत दिवस काढावे लागत आहेत. याकडे पालकमंर्त्यांनी स्वतः लक्ष देऊन अशासकीय सदस्यांची निवड करावी, अशी मागणी जोर धरू लागली आहे.

केंद्र व राज्य सरकार पुरस्कृत अर्थसहाय्य योजनेअंतर्गत निराधार विधवा परितक्त्या दिव्यांगांना मासिक एक हजार रुपये अर्थसहाय्य दिले जाते. यासाठी तालुकास्तरावर समिती गठित केली जाते. या समितीत पालकमंर्त्यांनी अशासकीय सदस्यांची शिफारस करणे अपेक्षित असते. मात्र, वाद नको म्हणून कोरोनाचे कारण पुढे करीत याबाबतीत पालकमंर्त्यांनीही हात वर केले आहेत. निराधारांना आधार देण्यासाठी संजय गांधी निराधार योजना, श्रावणबाळ निराधार योजना, इंदिरा गांधी वृध्दापकाळ योजना अशा योजना शासनाच्या वतीने सुरू करण्यात आल्या आहेत. यावर विविध क्षेत्रातील अशासकीय सदस्यांच्या नेमणुका पालकमंत्र्यांच्या शिफारसीनुसार केल्या जातात. मात्र गेल्या दीड वर्षापासून राज्यात कोरोनाचा कहर सुरू असल्याने अनेकांनी या अशासकीय सदस्यांच्या निवडीकडे दुर्लक्ष केले आहे. त्यामुळे जिल्ह्यातील विविध तालुक्यातील निराधार समित्यांचा कारभार त्या -त्या तालुक्याच्या तहसीलदारांवरच आहे.

त्यामुळे या समित्यांच्या बैठका नाहीत, तर या समित्यांकडे आलेल्या विविध अर्जांची योग्यवेळी छाननी होऊन मंजुरी मिळत नाही. त्यामुळे जिल्ह्यातील हजारो निराधार शासनाकडून मिळणाऱ्या अर्थसहाय्यापासून वंचित आहेत. तसेच तहसीलदारांना अनेक कामे असल्यामुळे गेल्या दीड वर्षात कमिट्यांच्या बैठकांमध्ये अनियमितता आली आहे. त्यामुळे जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यात असणाऱ्या या निराधार समित्यांची पुनर्स्थापना करावी, अशी मागणी आता लावून धरण्यात आली आहे. दुसरीकडे या समित्यांवर कोणाची नेमणूक करायची, या नेमणुकांमुळे कोणाची नाराजी ओढावू नये तसेच तालुक्यातील स्थानिक नेत्यांना विश्वासात घेऊन या सदस्यांच्या नेमणुका कराव्या लागणार आहेत. त्यामुळे या समिती सदस्यांच्या नेमणुका म्हणजे कळीचा मुद्दा ठरणार असल्यानेच पालकमंत्री नबाब मलिक यांनीही या समित्या निवडीकडे दुर्लक्ष केल्याचे बोलले जात आहे.

# गोरेगाव वनक्षेत्रात वाघांचा अधिवास

**गोरेगाव:** गोरेगाव वनपरिक्षेत्रात येणाऱ्या वन अधिनिष्ठ परिसरात वाघांचे आगमन झाले आहे. त्यामुळे पर्यटन विकासस्थळ म्हणून विकसीत होण्यासाठी नागझिरा अभयारण्य मुरदोली प्रवेशद्वार खुला करण्याची संधी वनविभागासह राजकीय पक्ष, वन्यजीव अभ्यासकांना चालून आली आहे.

गोरेगाव वनपरिक्षेत्र १ हजार २०० हेक्टर परिसरात पसरलेला आहे. जवळच नागझिरा अभयारण्य असल्याने वन्यजीव मोठ्या प्रमाणात या वनपरिक्षेत्रात वास्तव्यास आहेत. नागझिरा अभयारण्यातील वन्यजीवांना पाहण्यासाठी चोरखमारा, मंगेझरी तथा पिटेझरी असे तीन प्रवेशद्वार पर्यटकांकरिता खुले करण्यात आले आहे. परंतु गोरेगाव



वनपरिक्षेत्रात येणाऱ्या मुरदोली येथील नागझिरा अभयारण्य प्रवेशद्वार ३५ वर्षांपासून बंद ठेवण्यात आला आहे. त्यामुळे या परिसरातील पर्यटकांना नागझिरा अभयारण्यात असलेल्या वन्यजीव व सौंदर्याचे दर्शन घेता येत नाही. पिटेझरी, चोरखमारा, मंगेझरी प्रवेशद्वाराद्वारे अनेक पर्यटक वाघ पाहण्यासाठी पैसे खर्च करीत आहेत. पण कित्येकांना वाघ पाहता आले नाही याची खंत त्यांच्या मनात असते.

गोरेगाव वनपरिक्षेत्रात वाघांचा अधिवास असल्याने अनेकांना वाठ जवळून पाहता आले आहे. नागझिरा अभयारण्य मुरदोली, गराडा, जांभुळपाणी, सोदलागोंदी, पिंडकेपार, रामाटोला, हिरापुर, आसलपानी, बोळूंदा या गावालगत सीमा पसरली आहे. गोरेगाव वनपरिक्षेत्रात कटंगी बुजरुक, पिंडकेपार, पांगडी, सोनेगाव, नवरगाव, शहारवानी, धानुटोला, तिल्ली मोहगाव, कलपाथरी, घुमर्रा, जांभळी, गिधाडी, आंबेतलाव, मांडोदेवी देवस्थान परिसर सूर्यापूर आ भागात वनक्षेत्र असल्याने वाघ, बिबट, सांभर, नीलगाय, हरिण, जंगली म्हशी, ससे, रानडुकरे, मोर, रानकुत्री असे अनेक जातींचे वन्यजीव वास्तव्यास आहेत. त्यातच काळ्या हरिणाचे आगमन झाल्याची चर्चा होत आहे.

या वनपरिक्षेत्राचा पर्यटक विकास साधण्यासाठी सर्वप्रथम मुरदोली, नागझिरा अभयारण्य प्रवेशद्वार सुरु करण्याची गरज आहे. हे प्रवेशद्वार सुरु झाल्याच बेरोजगार तरुणांना रोजगार उपलब्ध होऊन विकासकामांना गती येईल व शासनाच्या तिजोरीत राजस्व जमा होण्यास मदत मिळेल हे तितकेच खरे आहे.

# ओबीसी वसतिगृहांसाठी राज्यात जमीन नाही



**नागपूर:** इतर मागास वर्गातील (ओबीसी) मुला-मुलींना जिल्हा मुख्यालयाच्या ठिकाणी राहून शिक्षण घेता यावे म्हणून वसतिगृह बांधण्याची योजना हाती घेण्यात आली. मात्र, ओबीसींच्या वसतिगृहांसाठी राज्यातील एकाही जिल्ह्यात शासकीय जमीन उपलब्ध नसल्याचे दिसून येत आहे.

ओबीसींसाठी प्रत्येक जिल्ह्यात दोन याप्रमाणे ७२ वसतिगृह बांधण्यात येणार आहेत. यासाठी राज्यातील विविध जिल्ह्यातून प्रस्ताव ओबीसी मंत्रालयाकडे येणे अपेक्षीत आहेत. मागील सरकारने नागपूर, यवतमाळ, वाशीम आणि अहमदनगर या चार जिल्ह्यात ओबीसी विद्यार्थिनीसाठी शासकीय वसतिगृहे उभारण्याच्या प्रस्तावास मान्यता दिली होती. तेथे भुखंडही उपलब्ध करण्यात आले. परंतु केंद्राकडून त्या प्रस्तावास अजून मंजुरी मिळाली नाही. तर उर्वरित जिल्ह्यात ओबीसी वसतिगृहांसाठी जमीन नसल्याची बाब समोर आली आहे. वसतिगृहांसाठी संबंधित जिल्ह्यात जमीन उपलब्धतेबाबत अहवाल ओबीसी विभागाला प्राप्त झाला नसल्याचे ओबीसी मंत्रालयाचे तत्कालीन सचिव जे.पी. गुप्ता यांनी सांगितले.

राज्यात ओबीसी विद्यार्थी-विद्यार्थिनींसाठी प्रत्येक जिल्ह्यात दोन याप्रमाणगे ७२ वसतिगृहे उभारण्याची योजना आहे. यामध्ये केंद्र सरकारचा ६० टक्के आणि राज्य सरकारचा ४० टक्के निधीचा वाटा राहणार आहे. केंद्राने पहिल्या चार वसतिगृहांना अद्याप मान्यता दिलेली नाही. असेही गुप्ता यांचे म्हणणे आहे.

सरकार ओबीसी विद्यार्थ्यांबाबत गंभीर नसल्याचे दिसून येते. वसतिगृह बांधण्यात विलंब होत आहे. तर विद्यार्थ्यांना भाड्याची थेट रक्कम देखील देण्यात आली नाही. राज्यात अनुसूचित जाती व जमातीच्या विद्यार्थ्यांसाठी शासकीय व अनुदानित वसतिगृहे आहेत. ओबीसींना त्यात २ ते ३ टक्के प्रवेश दिला जातो. उच्च शिक्षणासाठी शहरात आलेल्या विद्यार्थ्यांना घरभाडे देणे परवडत नाही. त्यामुळे अनेक विद्यार्थी उच्च शिक्षणापासून वंचित राहतात. निधीची चणचण असेल तर ओबीसी विद्यार्थ्यांसाठी किमान विभागीय पातळीवर तरी राज्य शासनाने तातडीने वसतिगृह उभारावे, अशी मागणी स्टुडंट्स राईट्स असोसिएशन ऑफ इंडिया या संघटनेचे अध्यक्ष उमेश कोरराम म्हणाले.

# तलाठ्याकडूनच भरावी ई-पीक पाहणी;टेमनी येथील शेतकऱ्यांची मागणी



**गोंदिया(देवेंद्र रामटेके)-** सध्या शासनाकडून शेतकऱ्यांसाठी वरदान असलेला ई- पीक पाहणी हा प्रकल्प युद्धस्तरावर राबविण्यात येत आहे.मात्र या प्रकल्पांतर्गत मोबाईल ॲप मध्ये माहिती अपलोड करतांनी शेतक?्यांना मोठी अडचण येत असल्याने सदर अपलोड ची कामे ही तलाठ्याकडूनच करवून घेण्यात यावी, अशी मागणी गोंदिया तालुक्यातील टेमनी येथील शेतकऱ्यांनी प्रशासनाकडे केली आहे.

शेतकऱ्यांना विविध योजनांचा सरळ लाभ पुरविण्यासाठी शासनाने त्यांच्या शेतातील लागवड केलेल्या पिकांची माहिती शासन दरबारी उपलब्ध व्हावी म्हणून ई -पीक पाहणी प्रकल्प राबविण्यास सुरुवात केली आहे. या अंतर्गत प्रत्येक शेतकऱ्यांनी आपल्या शेतातील पिकांची माहिती मोबाईल ॲप च्या माध्यमातून अपलोड करणे गरजेचे आहे. मात्र हे करीत असताना अनेक शेतकऱ्यांना मोठी अडचण येत आहे. त्यातच अनेक शेतकऱ्यांकडे अँड्रॉइड फोन नसल्यामुळे त्यांना नोंदणी कशी करावी असा प्रश्न पडला आहे. त्यातच अनेक गावात मोबाईल नेटवर्क ची मोठे समस्या आहे त्यामुळे माहिती अपलोड करतांनी शेतकऱ्यांना तारेवरची कसरत करावी लागत आहे.

याव्यतिरिक्त अनेक कुटुंबातील सातबारा एकत्र आहे परंतु जमिनीची आपसात कौटुंबिक हिस्से वाटणी झाली आहे. त्यामुळे प्रत्येक हिस्सेदाराने माहिती कशी भरावी असा प्रश्न या शेतकऱ्यांसमोर उभा ठाकला आहे. अनेक शेतकरी गरीब असून त्यांच्या कडे अँड्रॉइड फोन देखील उपलब्ध नाही. या व्यतिरिक्त तलाठयाकडे सर्वच सोई सुविधा उपलब्ध असून शेतीतील सर्व माहीत त्याच्या कडे उपलब्ध आहेत त्यामुळे सदर ई-पिक माहिती त्यांना स्वतःभरणे सोपस्कार होणार आहे.

शेतकऱ्यांच्या अनेक समस्या विचारात घेता शासनाने ही इ-पीक संबंधाची माहिती तलाठ्याकडूनच भरून घ्यावी व शेतकऱ्यांना यातून मोकळे करावे अशी मागणी टेमनी येथील शेतकरी ओमप्रकाश पटले, तिलकचंद पटले, मनीराम पंडेले, योगराज पटले,जीवन दमाहे, योगराज नागपुरे, हिरासिंग दमाहे, लक्ष्मीचंद नागपुरे, यांनी शासनाकडे केली आहे.

# केतन तुरकर राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष



**गोंदियाः-** राष्ट्रवादी कांग्रेस भवन येथे झालेल्या राष्ट्रवादी युवक कांग्रेसच्या सभेत केतन तुरकर यांची जिल्हाध्यक्ष म्हणून नियुनती करण्यात आली. खासदार प्रफुल पटेल यांच्या आदेशाने व मा. राजेन्द्र जैन यांचा मार्गदर्शनाने ही नियुनती करण्यात आली. राष्ट्रवादी कांग्रेस भवन येथे राष्ट्रवादीी युवक कांग्रेसचे प्रदेशाध्यक्ष मेहबूबभाई शेख, प्रदेश कार्याध्यक्ष रविकांत वर्पे, माजी आमदार राजेन्द्र जैन, आमदार मनोहर चंद्रिकापुरे, राष्ट्रवादीचे जिल्हाध्यक्ष विजय शिवणकर यांच्या हस्ते केतन तुरकर यांना राष्ट्रवादीयुवक कांग्रेसचे जिल्हाध्यक्ष म्हणून नियुनती पत्र देण्यात आले.

या वेळी राष्ट्रवादी युवक कांग्रेसचे माजी जिल्हाध्यक्ष किशोर तरोणे,नागपूरचे प्रभारी सौरभ मिश्रा,नागपूर जिल्हाध्यक्ष शैलेन्द्र तिवारी प्रामुख्याने उपस्थित होते.

यावेळी तुरकर यांना अध्यक्ष म्हणून निवड करण्यात आल्यानंतर लोकपाल गहाणे, विनायक शर्मा, दिनेश कोरे, नितिन टेभरें, रविकुमार पटले, नीरज उपवंशी, आर.दि अग्रवाल, इम्रान शेख, रंजित टेभरें, दिलप्रितसिंग वोरा, रोहित पटले, माधुरी सहारे, श्रुती कावळे, स्वाती दमाहे, सायमा खान, रुपाली रोटकर, सौरभ रोकडे, एकनाथ वाहिले, चेतन कुंभारे, चाहत मेश्राम, आकाश नागपुरे, नियाज शेख, त्रिलोक तुरकर,संकेत पटले, विजय कोल्हे यांनी अभिनंदन केले.

# साहेब..मोबाईलच नाही तर कशी करणार ई-पीक नोंदणी?

● शेतकऱ्यांचा प्रश्न ● लाखो शेतकरी मुकणार पिक नोंदणीला




**गोंदिया:** महाराष्ट्र सरकारने यावर्षी ई-पीक पाहणी सुरू केले आहे. महसूल विभाग आणि कृषी विभागाच्या वतीने ई-पीक पाहणी हा संयुक्त प्रकल्प राबवण्यात येत आहे. याच्या माध्यमातून शेतकऱ्यांना त्यांनी लागवड केलेल्या पिकाची नोंद करायची आहे. परंतु जिल्ह्यातील बहुतांश शेतकऱ्यांकडे अँड्रॉइड मोबाइल नसल्याने "साहेब, तुम्हीच सांगा ई पीक नोंदणी कशी करावी?' असा प्रश्न शेतकरी उपस्थित करीत आहेत.

माझी शेती, माझा सातबारा, माझा पिकपेरा या घोषवाक्याचा आधारे शासनाने सुरू केलेल्या पीक पाहणी नोंदणी करण्याला गोंदिया जिल्ह्यांमध्ये शेतकऱ्यांचा प्रतिसाद कमी मिळत आहे. तर काही ठिकाणी महसूल प्रशासनाला पीक पाहणी ॲपचा वापर करावा, यासाठी शेतकऱ्यांमध्ये जनजागृती करून सुद्धा शेतकऱ्यांना कळेनासे झाले आहे.

ई-पीक पाहणी नोंदवण्यास १९ दिवस शिल्लक असून, ई-पीक पाहणी ॲपद्वारे पिकाची नोंद करण्यास शेतकऱ्यांना ३० सप्टेंबरपर्यंत मुदत आहे. गोंदिया जिल्ह्यात शासन नोंदीनुसार २ लाख ७२ हजार १७८ शेतकरी आहेत.

पैकी आतापर्यंत ४५ हजार शेतकऱ्यांनी ई पीक पाहणी ॲपद्वारे पिकाची नोंदणी केल्याची माहिती कृषी विभागाकडून मिळाली आहे. जिल्ह्यात एकूण क्षेत्राच्या १ लाख ७८ हजार १८ हेक्टरमध्ये धानाची लागवड करण्यात आली आहे.

५ हजार ६९५ हेक्टर क्षेत्रात तूर, ६७ हेक्टरमध्ये मका, तीळ ९०० हेक्टर, ऊस ७०० हेक्टर, कापूस २ हेक्टर, भाजीपाला ६५० हेक्टर, हळद २८४ हेक्टर, आले ११३ हेक्टर, केळी व पपई ३० हेक्टर तर २५ हेक्टर क्षेत्रात सुगंधित वनस्पतीची लागवड करण्यात आल्याची नोंद कृषी विभागाच्या अहवालात आहे. ई पीक पाहणी ॲपद्वारे शेतकऱ्यांना त्यांनी लागवड केलेल्या पिकाची नोंद करावयाची आहे. ही नोंद सातबारा अभिलेखावर नोंद होते.

या नोंदी नुसारच नुकसान झाल्यास भरपाई देय राहणार आहे. तसेच पीक विमा आणि इतर योजनांचा लाभही या नोंदणी नुसारच मिळणार आहे. परंतु जनजागृती अभावी आणि बहुतांश शेतकऱ्यांकडे अँड्रॉइड मोबाइलच नसल्याने जिल्ह्यातील लाखो शेतकरी ई-पिक नोंदणीला मुकणार असल्याची शंका वर्तविण्यात येत आहे.

माझ्याकडे तीन एकर शेती असून धानाची लागवड केली आहे. साधा मोबाइल असल्याने माझे पीक पेरे आभासी नोंदणी करण्याची मोठी समस्या असल्याचे फत्तेपुर येथील शेतकरी श्यामलाल रिणायत यांनी सांगितले.

ई-पीक पहाणी म्हणजे काय कळलेच नाही, तर इ पीक नोंदणी कसे करणार असा प्रश्न शेतकरी माधव लिल्हारे यांनी उपस्थित करून शासनाची पीक नोंदणी पद्धत चुकीची असल्याची प्रतिक्रिया व्यक्त केली.

**पीक नोंदणीला मुदतवाढ**

ई-पीक नोंदणी करणे शेतकऱ्यांसाठी त्रासदायक ठरत आहे. अनेक शेतकऱ्यांना याबाबत माहितीच नाही. त्यामुळे शासनाच्या या योजनेला अल्पप्रतिसाद मिळत असल्याने शासनाने ई पीक नोंदणीला १५ सप्टेंबर ऐवजी ३० सप्टेंबरपर्यंत मुदतवाढ दिली आहे. यासंदर्भातील पत्रक ९ सप्टेंबर रोजी जारी करण्यात आला आहे.

# जिल्ह्यातील ग्रामपंचायतींनी केलेल्या अफरातफरीची ४०५ प्रकरणे




**गोंदिया:** जिल्ह्यात ५४६ ग्रामपंचायती आहेत. परंतु सरपंच व ग्रामसेवकांनी गावचा विकास करण्यापेक्षा शासकीय निधी हडपण्याची जणू शर्यतच लावली आहे. जिल्ह्यातील ५४६ ग्रामपंचायतीपैकी बहुतांश ग्रामपंचायतींनी शासकीय निधीची अफरातफर केल्याची ४०५ प्रकरणे जिल्हा परिषदेकडे आली आहेत. या प्रकरणांवरुन ग्रामसेवक गावच्या विकासासाठी की विकास निधी हडपण्यासाठी हा प्रश्न उपस्थित होत आहे.

जिल्ह्यात आमगाव, सालेकसा, देवरी, सडक-अर्जुनी, अर्जुनी-मोरगाव, गोरेगाव, तिरोडा, गोंदिया हे ८ तालुके आहेत. या आठही तालुक्यात असलेल्या ग्रामपंचायतची संख्या आजघडीला ५४६ आहे. बांधकामात मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार, काम न करताच निधीची उचल असे विविध प्रकरण गावकरीच चव्हाट्यावर आणतात. यासंदर्भात मागील २-३ वर्षात जिल्हा परिषदेला ४०५ तक्रारी आल्या आहेत. काही तक्रारींवर सुनावणी सुरु असून काही प्रलंबित आहेत.

ग्रामपंचायतमधील सर्व माहिती ऑनलाईन झाली. तर ग्रामपंचायतींचा भोंगळ कारभार चव्हाट्यावर येईल. ऑनलाईन ग्रामपंचायत नसल्यामुळे ग्रामपंचायतीने कोणती कामे केली व कोणती कामे केली नाहीत याची माहितीच नागरिकांना मिळत नाही. अनेक कामे न करताच बिलाची उचल केली जाते व ते बिंग ऑनलाईनमुळे फुटेल त्यासाठी ग्रामपंचायत ऑनलाईन केली जात नाही. काही ठिकाणी मोबाइल टॉवरच्या अभावामुळे ऑनलाईन करणे शक्य होत नाही. परंतु ही संख्या अत्यंत कमी आहे. परंतु बिंग फुटू नये या धास्तीपोटी ग्रामपंचायतचा कारभार ऑनलाईन होत नाही.